# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०९/०२/२०१८

**१) जादुटोना करण्याचे कारणा वरून भांडण करुन मारहान केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०७/०२/२०१८ चे ०९.३० वाजता दरम्यान यातील आरोपी हा फिर्यादी अमुल नामदेव चौधरी वय १९ वर्ष रा. उर्सरा याचे खुल्या घराचे छपरात व अंगनात येवुन सिडी डॉन मोटार सायकल क्र. एमएच ३५ एल ५८९२ ही पांढ–या रंगाची ठेवलेली तिला लात मारून खाली पाडले व छपरात लागलेला बल व फोटोचा काच फोडुन तुझा वडील जादुखोर आहे? मला जादु केला आहेस, असे बालुन फिर्यादीचे वडीलास लाथ मारून हनुमान मुर्तीवर हात ठेवण्यास भाग पाडल्याने, फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ४४८,४२७ भादवी. सहकलम २(१)(ख),६ महा.जादुटोना कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील पोनी. गुरनुले पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**२) लाचलुचपत प्रतिबंध विभाग यांची कारवाई . :–**

दिनांक ०८/०२/२०१८ चे १२.३६ वाजता दरम्यान यातील आरोपी याने तक्रारी आशीष पांडुरंग परशुरामकर वय २४ वर्ष रा. पिंपळगाव कोहळी यांना त्याचे किरकोळ देशी दारू विक्री सरू करण्याकरीता व कोणत्याही प्रकारची कार्यवाही न करण्याकरीता महिन्याचे उर्वरीत ४,०००/रु. व चालु महिन्याचे ९,०००/रु. पैकी तडजोळी अंती ७,०००/रु. असा एकुण ११,०००/रु. ची पडताळनी कार्यवाही वेळी लाचची मागणी करून प्रत्यक्ष सापळा कार्यवाही वेळी ११,०००/रु. ची लाच रक्कम स्विकारतांना मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोनी. पारधी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ७,१३(१),(ड)सहकलम .ला. प्र. का १९८८ अन्वये. गुन्हा दाखल करण्यात आला. पोनी. पारधी पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**३) मोटार सायकलच्या धडकेत दोन जखमी . :–**

दिनांक ०७/०२/२०१८ चे १५.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी सुमित विनोद मेश्राम वय २५ वर्ष, रा. नवेगाव हा आपले आईला घेवुन आपले हिरो होंडा मोटार सायकल क्र. एमएच यु ५३६९ ने नवेगाव येथे येत असतांना यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन विरुध्द दिशेने हयगयीने, निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीच्या मोटार सायकल ला नवेगाव येथे धडक मारुन फिर्यादीस व त्याच्या आईस जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम २७९,३३७ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. दिक्षीत पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**४) मारोती वाहन हयगयीने चालवुन ८ ईसमांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०८/०२/२०१८ चे १५.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी अतुल चरणदास काळे वय ३६ वर्ष, रा. अमन गॅरेज कॅम्प जवळ मोहन नगर नागपुर याने त्याचे ८ नातेवाहीका सोबत यातील मारोती ८०० गाडीत बसुन भंडारा येथे अंतीम संस्कारा करीता आले होते, व अंतीम संस्कार करुन एनएच ६ रोडने नागपुर ला जात असतांना यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मारोती वाहन हयगयीने, लापरवाहीने चालवुन अपघात करुन गाडीत असलेले ८ ईसमांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने जखमीचे बयान व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,३३७,३३८ भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पोलीस स्टेशन जवाहरनगर करीत आहेत.

**५) बौध्द विहारातील रोख रक्कम व सामानाची चोरी . :–**

दिनांक ०६/०२/२०१८ चे १८.०० ते ०८/०२/२०१८ चे १४.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही बाहेर गावी गेली असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन बौध्द विहारातील दान पेटीसह रोख रक्कम अंदाजे १५,०००/–रु, गॅस स्टॅन्ड, ४ ईलेक्ट्रीक बल एकुण २०,६००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी संघप्रिया भिक्षुनी वय ६५ वर्ष रा. सचिव दसबळ पहाडी बौध्द विहार सितेपार हत्तीडोई यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. थेर पोलीस स्टेशन भंडारा करीत आहेत.

**६) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०८/०२/२०१८ चे १७.०० ते १७.४५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी हे धारगाव ते वैनगंगा नदी मोठा पुलीया येथे एनएच ६ रोडने पेट्रोलींग करीत असता, यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ट्रेलर वाहन कारधाच्या दिशेने ऊभे करुन सार्वजनिक वाहतुकीस अडथळा निर्माण लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभे करुन मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोहवा. भुरले यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भुरले पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**७) विहीरीत पडुन तरुणाचा मृत्यु . :–**

दिनांक ०७/०२/२०१८ चे १८.०० वाजता. यातील मृतक रविन्द्र माधव ऊईके वय २६ वर्ष, रा. मेंढा/सोमलवाडा हा दैत मांगली शेत शिवारात शेळयाचा चारा आणण्याकरीता गेला असता शेतामध्ये जमिनीलगत असलेल्या विहीरीत पडुन मरण पावल्याने फिर्यादी सतिश अभिमन ऊईके वय २२ वर्ष, रा. मेंढा/ सोमलवाडा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. टेभुर्णेकर पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**८) इसमाचे प्रेत मृत अवस्थेत मिळुन आल्याने मर्ग नोंद . :–**

दिनांक ०७/०२/२०१८ चे २२.०० वाजता ते ०८/०२/२०१८ चे ०५.३० वाजता दरम्यान यातील मृतक दुधराम गणपत बडोले वय ५५ वर्ष, रा. केसलवाडा वाघ हा मृताअवस्थेत कुमार पेट्रोल पंप जवळ मुरमाळी येथे मिळुन आल्याने फिर्यादी सचिन दुधराम बडोले वय २७ वर्ष, रा. केसलवाडा वाघ यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**९) अवैध दारु / जुगार अड्डयांवर धाडी . :–**

दिनांक ०८/०२/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन पवनी व पालांदुर येथे अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ८५(१) म.दा.का तचेस जुगारातुन किंमती १५१०/रु. असा एकुण १५१०/रु. चा माल जप्त करण्यात आला.

**१०) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ०८/०२/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ६७ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०४ तीन सिटर वाहनाकरीता ०३ ईतर वाहनांवरती – ६० केसेस करण्यात आले आहे.

०९.२

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.